# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.11.2025** **वार- सोमवार**

---

**<u>प्रधानमंत्री पीक योजना</u>**

वर्ष 2025-26 मधील रब्बी हंगामातील पीक विमा योजनेच्या नोंदणीसाठी राष्ट्रीय पीक विमा पोर्टल सुरू करण्यात आलं आहे. ज्वारी पिकासाठी 30 नोव्हेंबर, गहू, हरभरा आणि कांदा पिकासाठी 15 डिसेंबर आणि उन्हाळी भुईमूगासाठी 31 मार्च 2026 पर्यंत या पीक विमा योजनेत सहभागी व्हावं, असं आवाहन विभागीय कृषी सहसंचालक दत्तात्रय गावसाने यांनी केलं आहे. नैसर्गिक आपत्तींमुळं होणाऱ्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना राबवण्यात येत आहे.

**<u>रस्ते सुरक्षा</u>**

रस्त्यावरच्या खड्डयामुळे मृत्यू किंवा जखमी झालेल्या पीडितांच्या कुटुंबियांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे भरपाईबाबत दावा दाखल करता येईल असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयानं गेल्या महिन्यात दिला. या पार्श्वभूमीवर खड्डे किंवा असुरक्षित रस्त्यांबाबतची तक्रार नागरिकांनी संबंधित प्राधिकरणाकडं तत्काळ दाखल करावी, असं आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील यांनी केलं आहे. खड्ड्यामुळे मृत्यू किंवा जखमी झालेल्या पीडितांच्या कुटुंबियांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण संपूर्ण सहकार्य करेल असं त्यांनी सांगितलं.

**<u>अफवा</u>**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांबाबत "महामंडळाचं कामकाज बंद झालं आहे, व्याज परतावा थांबवण्यात आला आहे" अशा अफवा समाज माध्यमासह विविध माध्यमांतून पसरवल्या जात आहेत. या अफवांमध्ये कोणतंही तथ्य नसून, नवीन पात्रता प्रमाणपत्र देण्याचं काम वगळता महामंडळाचं इतर सर्व कामकाज सुरळीतपणे सुरु असल्याची माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी दिली आहे.

**<u>अधिवेशन</u>**

बँक ऑफ इंडिया कर्मचारी संघटनेच्या पुणे विभागाचं त्रैवार्षीक अधिवेशन एस पी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलं होतं. या अधिवेशनाचं उद्घाटन कॉम्रेड दिनेश झा लल्लन यांच्या हस्ते झालं. मराठवाड्यातल्या आपदग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत म्हणून 1 लाख रुपयांचा धनादेश यावेळी महाराष्ट्र स्टेट बँक एम्प्लॉईज फेडरेशनकडे सुपूर्द करण्यात आला.

**<u>सोहळा</u>**

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या 755 व्या संजीवन समाधी सोहळ्यासाठी पंढरपूरहून निघालेल्या संत नामदेव महाराजांच्या आणि पंढरपूरच्या पाडुरंगाच्या पालखीचं आज नीरा इथं उस्फूर्त स्वागत करण्यात आलं. कोल्हापूर,

सांगली, साताऱ्यासह कोकण आणि कर्नाटकातील साडेपाच हजार वारकरी या सोहळ्यात सहभागी झाले आहेत. पालखी सोहळा प्रमुख विठ्ठल वासकर यांनी ही माहिती दिली.

**<u>मोहोळ</u>**

पुस्तक ही केवळ वस्तू नसून ती ज्ञान, शिक्षण आणि संस्कृतीचा पाया आहे. त्यामुळे पुस्तकांवरील वस्तू आणि सेवा कर कमी करून पुन्हा 12 टक्क्यांवर आणावा किंवा शैक्षणिक वापरासाठी असलेल्या कागद आणि पुस्तकांना करातून पूर्णतः सूट द्यावी अशी मागणी खासदार मुरलीधर मोहोळ यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे केली आहे. शैक्षणिक साहित्य प्रकाशन संस्था आणि शैक्षणिक क्षेत्राच्या मागणीनुसार मोहोळ यांनी केंद्रिय अर्थमंत्र्यांना याबाबत औपचारिक पत्र पाठवलं आहे.

**<u>पाणी टंचाई</u>**

पुणे महापालिकेत समाविष्ट 32 गावांमधल्या वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर तातडीनं उपाययोजना करण्याची मागणी आम आदमी पक्षानं केली आहे. पक्षाचे शहराध्यक्ष धनंजय बेनकर यांनी आयुक्त नवल किशोर राम यांना आज याबाबतचं निवेदन दिलं. पाणीपुरवठा व्यवस्थेत पारदर्शकता आणावी आणि टँकरद्वारे होणाऱ्या पुरवठ्याची चौकशी करावी, अशी विनंती या निवेदनात करण्यात आली आहे.

**<u>वाहतूक</u>**

12 ते 20 नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या आळंदी यात्रेच्या काळात आळंदी आणि देहू परिसरात जड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आली आहे. देहूगांव आणि आळंदी भागातील गर्दी टाळण्यासाठी अत्यावश्यक सेवा, रुग्णवाहिका आणि दिंडीतील वाहनं वगळता इतर सर्व वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड पोलिसांच्या वाहतूक नियंत्रण शाखेनं याबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

**<u>क्रीडा</u>**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेनं आयोजित स्पोर्ट्सफिल्ड मान्सून लीग' क्रिकेट स्पर्धेत आज योगेश इलेव्हन संघानं विजय क्रिकेट ॲकॅडमीवर विजय मिळवला. तर दुसऱ्या सामन्यात गॅरी कर्स्टन क्रिकेट ॲकॅडमीनं पोलिस बॉइज स्पोर्टस अकॅडमीचा पराभव केला. दोन्ही विजेत्या संघांनी उपांत्यपूर्व फेरीतलं आपलं स्थान निश्चित केलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 31 तर किमान तापमान 13 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमधे.**

**नमस्कार.**